महाराष्ट्र शासन
# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे
दूरध्वनी क्र.०२०-२५६५६२३४/२५६५७१७६
Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in
४१२ ई शिवाजीनगर, पुणे ४११ ०१६.

जावक क्रमांक : तंशिविकापु/विवि/थेट द्वितीय वर्ष रिक्त जागा/२०२१/ 4990

दिनांक : ०९.११.२०२१
09 NOV 2021

**महत्वाचे परिपत्रक (कालमर्यादा १०.११.२०२१)**

प्रति,
प्राचार्य,
शासकीय/अशासकीय अनुदानित/खाजगी विनाअनुदानित
अभियांत्रिकी व औषधनिर्माणशास्त्र पदवी अभ्यासक्रमांच्या संस्था,
पुणे विभाग.

विषय : शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मध्ये थेट द्वितीय वर्ष प्रवेशासाठी रिक्त जागांची नोंदणी करण्याबाबत..
संदर्भ : मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र
जा.क्र. २अ/एडीएम/DSE-DSP Vacancy/२०२१/४३७ दिनांक ०९.११.२०२१.

उपरोक्त विषयास अनुसरुन, शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील पदवी अभियांत्रिकी व औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमांच्या थेट द्वितीय वर्ष प्रवेश प्रक्रियेच्या अनुषंगाने, आपणास कळविण्यात येते की, आपल्या संस्थेतील द्वितीय वर्ष पदवी अभियांत्रिकी अभ्यासक्रमातील संस्थांतर्गत शाखा बदल केलेल्या विद्यार्थ्यांचे माहिती व विद्यार्थ्यांचा निकाल राज्य सामाईक प्रवेश परिक्षा कक्षाच्या थेट द्वितीय वर्ष अभ्यासक्रमाच्या संकेतस्थळावरील **Vacancy Calculation Module** मधून संस्थेच्या लॉगीनद्वारे ऑनलाईन पध्दतीने अपडेट केल्यानंतर, रिक्त राहिलेल्या जागांची पडताळणी करुन अंतिम मान्यते करिता या विभागीय कार्यालयाकडे ऑनलाईन पध्दतीने सबमिट करावी. तसेच ज्या अभियांत्रिकी/औषधनिर्माणशास्त्र पदवी अभ्यासक्रमांच्या संस्थांमधील शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये प्रथम वर्षात प्रवेशित विद्यार्थ्याचा प्रवेश रद्द झाला असेल तर अशा विद्यार्थ्याचे लिव्हींग सर्टीफीकेटची कार्यालयीन प्रत या विभागीय कार्यालयास ई-मेलद्वारे (ropune@dtemaharashtra.gov.in) सादर करावी. ई-मेल पाठविताना विषयामध्ये (Direct Second Year vacancy confirmation against cancellation of admission for Inst code 6XXX) असे नमूद करावे. तसेच संस्थेचे पत्र व लिव्हींग सर्टीफीकेट एकाच पीडीएफ फाईल मध्ये पाठवावे.

**संस्थेने थेट द्वितीय वर्ष प्रवेश प्रक्रिया २०२१-२२ करिता जागा पडताळणीची कार्यवाही दिनांक १०.११.२०२१ रोजी (संध्याकाळी ५ वाजेपर्यंत) पूर्ण करावी. विहित मुदतीत प्रवेशासाठीच्या जागा निश्चितीबाबतची माहिती अपडेट न केल्यास, सदर संस्थेच्या जागांचा समावेश प्रवेश प्रक्रियेसाठी करता येणार नाही याची गांभीर्याने नोंद घ्यावी.**

(डॉ. द. व्यं. जाधव)
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे.

प्रत :
१) मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा. मुंबई (कार्यासन क्र. २अ) यांना माहितीस्तव.
२) प्रोग्रामर, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे यांना या कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करणेसाठी.